भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# –: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :–

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

## कालावधी (दिनांक ०२.११.२०१९ ते ०६.११.२०१९)

| अंक ८८/२०१९ | दिनांक ०१.११.२०१९ | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (२६/१०/२०१९ ते ०१/११/२०१९ पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता ०२/११/२०१९ ते ०६/११/२०१९ पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६/१० | २७/१० | २८/१० | २९/१० | ३०/१० | ३१/१० | ०१/११ | दिनांक | ०२/११ | ०३/११ | ०४/११ | ०५/११ | ०६/११ |
| ७९.८ | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ३.२ | पाऊस (मि. मी) | १० | १ | ० | १ | १२ |
| २८.० | ३२.० | ३६.० | ३६.५ | ३६.५ | ३४.५ | ३४.० | कमाल तापमान (अं. से) | ३५ | ३६ | ३६ | ३५ | ३५ |
| २१.० | २१.० | २१.० | २१.० | २१.० | २५.० | २४.० | किमान तापमान (अं. से) | २३ | २३ | २२ | २२ | २३ |
| ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | निरभ्र | सकाळ – मेघाच्छादन (ऑक्टा.) | ८ | ८ | ६ | ४ | ४ |
| ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | दुपार – मेघाच्छादन (ऑक्टा.) | | | | | |
| ९१ | ८८ | ८७ | ८४ | ८१ | ७० | ९० | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९१ | ९५ | ९३ | ९४ | ९५ |
| ७७ | ७२ | ५५ | ५५ | ५१ | ५५ | ६० | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ७३ | ६९ | ६२ | ६० | ६४ |
| १०.४ | २.२ | ३.५ | १.० | ३.१ | १.७ | २.३ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ०११ | ००७ | ००६ | ००५ | ००४ |
| आग्नेय | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | ईशान्य | आग्नेय | सकाळ – वा-याची दिशा | आग्नेय कडून | पूर्वे कडून | पूर्वे कडून | ईशान्य कडून | ईशान्य कडून |
| दक्षिणे | दक्षिणे | दक्षिणे | दक्षिणे | स्थिर | आग्नेय | आग्नेय | दुपार – वा-याची दिशा | | | | | |

| मागील वर्षातील (२०१८) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०१९ पासूनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०१९ पासूनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ३२६९.२ | ४५५८.६ | ४५५८.६ | ८३.० |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** येत्या ५ दिवसात जिल्ह्यात हलक्या स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता असुन वा-याचा वेग वाढण्याची शक्यता आहे.

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | काढणी | भात कापणीसाठी विद्यापीठाने विकसीत केलेल्या “वैभव विळ्याचा” वापर करावा जेणेकरुन भात जमिनीलगत कापले जाईल. जिल्ह्यात ज्या ठिकाणी भात पिकांची कापणी करण्यात आली आहे अशा ठिकाणी कापलेल्या भाताच्या पेंड्या झाकुन ठेवण्यात याव्यात व ज्यांना कापणी करावयाची आहे त्यांनी पाऊसाचा अंदाज पाहून कापणी करावी. |
| भुईमुग | आरा ते शेंगा | भुईमुगावर टिक्का रोगाचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास नियंत्रणासाठी कार्बेडॅझिम १० ग्रॅम किंवा डायथेन एम - ४५ २० ग्रॅम प्रती १० ली पाण्यातुन फवारावे. |
| कुळीथ व चवळी | पेरणी | कुळीथाची व रब्बी हंगामातील चवळी पिकाची पेरणी १५ ऑक्टोबर ते नोव्हेंबर अखेर पर्यंत करावी. पेरणीसाठी दापोली - १ व कोकण सदाबहार, कोकण सफेद या अनुक्रमे कुळीथ व चवळी या पिकाच्या सुधारीत जातींचा वापर करावा. कुळीथ व चवळी पिकाची पेरणी ३०x१५ सेमी या अंतरावर करावी. साधारणतः कुळीथासाठी प्रती हेक्टरी १८ ते २० किलो व चवळीसाठी प्रती हेक्टरी १५ ते १८ किलो बियाणे पुरते, बियाण्यास प्रती किलोस २.५ ग्रम थायरम या बुरशीनाशकाची व नंतर २५ ग्रम रायझोबीयम या जीवाणु संवर्धकाची बीज प्रक्रिया करावी. कुळीथासाठी २५ किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि ६० किलो पालाश व चवळीसाठी २५ किलो नत्र आणि ५० किलो स्फुरद या अन्नद्रव्याची मात्रा ओळीत सरीमध्ये बुजवुन द्यावी. |
| कडवा वाल | पेरणी | पिकाची पेरणी ऑक्टोबर व नोव्हेंबर मध्ये ३०x१५ सेमी किंवा ३०x२० सेमी किंवा ३०x३० सेमी या अंतरावर नांगरा पाठोपाठ करावी. पेरणीसाठी पिकाच्या कोकण वाल -१ व कोकण वाल -२ या सुधारीत जातींचा वापर करावा. पाभरीणे पेरणी केल्यास साधारणतः प्रती हेक्टरी ५० ते ६० किलो बियाणे पुरते. बियाण्यास प्रती किलोस ३.० ग्रम थायरम या बुरशीनाशकाची व नंतर २५ ग्रम रायझोबीयम या जीवाणु संवर्धकाची बीज प्रक्रिया करावी. पिकास ५० किलो स्फुरद या अन्नद्रव्याची मात्रा ओळीत बियाण्याखाली साधारण ५ सेमी खोलीवर द्यावी. |
| आंबा | पालवी | आंब्यामध्ये नविन पालवी आली असल्यास त्या पालवीचे तुडतुडे, शेंडा पोखरणारी अळी, पाने पोखरणारी अळी आणि मिजमाशीपासून आवश्यकतेनुसार संरक्षण करावे. त्यासाठी २५% प्रवाही डायमिथोएट किंवा ३६% प्रवाही मोनोक्रोटोफॉस ११ मिलि प्रति १० लि पाण्यात मिसळुन फवारणी करावी. |
| काजु | पालवी पुर्व | काजुवर खोडकिडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०% प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५० मी.लि. १० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. काजुमध्ये जुन्या व रोगट फांद्या कापल्यानंतर त्या ठीकाणी १% बोर्डोमिश्रन लावावे. |
| नारळ, सुपारी | फुलोरा | विद्यापिठाने शिफारस केल्याप्रमाणे नारळाला खताचा दुसरा हप्ता ७५० ग्र. युरिया ६६० ग्र. म्युरेट ऑफ पोटॅश प्रति माड या प्रमाणात द्यावा. खते द्यावयाच्या वेळी जमिनीत पुरेसा ओलावा असेल याची खात्री करावी. सुपारीवरील फळगळ या रोगाच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये १% बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी. |
| माती परिक्षण | - | जमिनीतील नत्र, स्फुरद व पालाशाचे प्रमाण तपासण्यासाठी खरीप पीकाची काढणी केल्यानंतर लगेचच मातीचा नमुना घ्यावा व तपासणीसाठी जवळच्या माती परिक्षण प्रयोगशाळेकडे पाठवावा. मातीचा नमुना कसा घ्यावा याबाबत अधिक माहीतीसाठी मृद शास्त्रज्ञ, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले यांचेकडे संपर्क साधावा. (दुरध्वनी क्र. ०२३६६-२६२२३४) |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील “ग्रामीण कृषि मौसम सेवा” योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>नोडल ऑफिसर<br>(ग्रामिण कृषि मौसम सेवा)<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) |
|---|---|---|